।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## EXAMINATION SECTION
**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: directorboee@gmail.com**

संदर्भ : संपवमुमं/परीपत्रका//२०२३-२४/ २१५ दिनांक : १६/०५/२०२३.

**आवाहन परिपत्रक**
**(मुल्यांकनासाठी)**

या परिपत्रकान्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मा.कुलगुरु महोदयांचे आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की,मा.कुलपती महोदयांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाच्या कुलगुरुंची बैठक दि.१५/०५/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विविध परीक्षांचे निकाल विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नसलेबाबत मा.कुलपती महोदयांनी खंत व्यक्त केलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ८८ नुसार परीक्षांचे निकाल किमान ३० दिवसात तर कमाल ४५ दिवसाच्या आत जाहीर करणे आवश्यक आहे. सदर बैठकीमध्ये मा.कुलपती महोदयांनी सर्व मा. कुलगुरु महोदयांना निकाल वेळेवर लागले नाहीत तर आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल असे निर्देश दिलेले आहेत. परीक्षेचे निकाल वेळेवर जाहीर करण्याची बाब मा.कुलपती महोदय श्री. रमेश बैस व तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांनी अतिशय गांर्भीयाने घेतलेली आहे.

याबाबत आपणास या परिपत्रकान्वये आवाहन करण्यात येते की,उन्हाळी २०२३ व त्यापुढील सर्व परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकनाच्या कार्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गांभीर्यपुर्वक नोंद घेवुन मुल्यांकनाचे कार्य जलद गतीने करण्यात यावे. शिक्षकांनी कोणतेही वैयक्तीक कारण सांगुन मुल्यांकन कार्यात बाधा आणु नये,जेणेकरुन मुल्यांकन कार्यास विलंब होणार नाही.

उन्हाळी २०२३ च्या सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल वेळेवर जाहीर झाले नाहीत तर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४८ (५)(अ) नुसार संबंधीतांवर कार्यवाही करण्यात येईल,यामध्ये शास्ती व आपल्या पदाची मान्यता काढुन घेण्यापर्यंतची तरतुद आहे.

सदर परीक्षेच्या मुल्यांकनाच्या कार्यात सहकार्य करणार नाहीत अशा शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांची माहिती प्राचार्य व मुल्यांकन केंद्राचे समन्वयक यांनी संबंधीत शिक्षक/ कर्मचा-याचे, पदनाम,विषय व महाविद्यालयाचे नाव अशा स्वरुपाची माहिती निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे तातडीने पाठविण्यात यावी, जेणेकरुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४८ (५)(अ) नुसार संबंधीतांवर कार्यवाही करण्यात येईल,याची सर्व संबंधीतांनी गांर्भीयाने नोंद घ्यावी व हि बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणुन दयावी, हि विनंती.

आपला,

**डॉ.दिगंबर नेटके**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**
मा.कुलगुरु महोदय,प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरु महोदय,प्रस्तुत विद्यापीठ.
**प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :**
प्राचार्य,सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
संचालक,सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
उपकुलसचिव,सहा.कुलसचिव, सर्व कार्यालय अधिक्षक व सर्व सिनियर प्रोग्रामर, परीक्षा विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/